## ज्योतिषविषयक

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १७९ वा | मंगळवार, दि. १७ फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# अजितदादांच्या विमान दुर्घटनेवर नवे प्रश्न

## ब्लॅकबॉक्स जळालेल्या अवस्थेत; रोहित पवारांचा घातपाताचा संशय तीव्र

**मुंबई/बारामती (कटूसत्य वृत्त) :-** २८ जानेवारी रोजी झालेल्या भीषण विमान अपघातात तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर तब्बल २० दिवस उलटूनही तपासाला वेग नसल्याचा आरोप करत आमदार रोहित पवार यांनी पुन्हा एकदा गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. दरम्यान, अपघातग्रस्त विमानातील ब्लॅकबॉक्स जळालेल्या अवस्थेत सापडल्याची माहिती समोर आल्याने संशय अधिकच गडद झाला आहे.

### ब्लॅकबॉक्स जळालेल्या अवस्थेत ?

घटनेच्या दुसऱ्याच दिवशी घटनास्थळावरून ब्लॅकबॉक्स हस्तगत करण्यात आला होता. मात्र सूत्रांच्या माहितीनुसार तो काही प्रमाणात जळालेल्या अवस्थेत सापडला. त्यामुळे त्यातील डेटा सुरक्षित आहे का, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. डेटा रिकव्हर करण्यासाठी ब्लॅकबॉक्स परदेशात पाठवण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, केंद्र सरकार लवकरच याबाबत महत्त्वाचा निर्णय घेऊ शकते, अशी माहिती समोर येत आहे.

तपास यंत्रणांसाठी ब्लॅकबॉक्समधील फ्लाइट डेटा आणि कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डिंग अत्यंत निर्णायक ठरणार आहेत. अपघात की घातपात, या वादाच्या पार्श्वभूमीवर या डेटाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### रोहित पवारांचा संताप

रोहित पवार यांनी 'एक्स' या समाजमाध्यमावर पोस्ट करत तपासाच्या गतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. 'दुर्दैवी अपघाताला २० दिवस झाले, पण अजूनही तपासाला वेग नाही. केवळ VSR कंपनीला पुरावे नष्ट करता यावेत म्हणून उशीर होत नाही ना?' असा थेट सवाल त्यांनी केला. कंपनीला कुणाचा वरदहस्त आहे, हा प्रश्न सामान्य नागरिकांना पडल्याचेही त्यांनी नमूद केले. 'ब्लॅकबॉक्स खराब अवस्थेत असल्याची माहिती समोर येत आहे. पाच दिवसांपूर्वी मी जी भीती व्यक्त केली होती, ती खरी ठरताना दिसते,' असे सूचक विधान करत त्यांनी दोन दिवसांत पुन्हा पत्रकार परिषद घेऊन धक्कादायक खुलासे करणार असल्याचे जाहीर केले.





### 'नियोजित अपघात'चा आरोप

यापूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत रोहित पवार यांनी हा साधा अपघात नसून 'नियोजित अपघात' असल्याचा गंभीर आरोप केला होता. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी आणि गरज पडल्यास परदेशी तपास संस्थांकडे तपास सोपवावा, अशी मागणीही त्यांनी केली होती.

**भीषण दुर्घटनेची पार्श्वभूमी :** २८ जानेवारी रोजी मुंबईहून बारामतीकडे निघालेल्या विमानाचा बारामती विमानतळावर उतरताना ताबा सुटला. विमान जमिनीवर आपटताच मोठा स्फोट झाला आणि क्षणात आग भडकली. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला.

### सरकारचा निर्णय महत्त्वाचा

ब्लॅकबॉक्समधील डेटा रिकव्हर होणे आणि त्यातील निष्कर्ष सार्वजनिक होणे हेच या प्रकरणातील सत्य उजेडात आणण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. तपास प्रक्रियेला वेग देण्याबाबत सरकार पुढील एक-दोन दिवसांत मोठा निर्णय घेण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, अपघात की घातपात या प्रश्नावर राजकीय वातावरण तापले असून रोहित पवार यांच्या आगामी पत्रकार परिषदेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सत्य बाहेर येईपर्यंत आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील तीन मित्रांचा पहाटे मृत्यू



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शहरातील रुपाभवानी चौकात सोमवारी (दि. 16) पहाटे तीनच्या सुमारास आयशर टेम्पोने दुचाकीला दिलेल्या धडकेत तीन तरुण जागीच ठार झाले. घटना समजताच तरुणांच्या नातेवाईकांनी शासकीय रुग्णालयात गर्दी केली.

हाताला आलेली घरातील तरुण मुले अचानक गेल्याने कुटुंबीयांना मोठा धक्का बसला. नागेश प्रकाश गवंडी (वय 27, रा. रविवार पेठ), रोहन अशोक कोरे (वय 23, रा. श्रीशैल नगर, भवानी पेठ) आणि बसवराज सुनील चनशेट्टी (वय 25, रा. बाळशेट्टी नगर, शेळगी) अशी मृत्युमुखी पडलेल्या तीन तरुणांची नावे आहेत.


सोमवारी पहाटे हे तिघे तरुण एकाच दुचाकीवरून (एम. एच.13 ई.आर. 0627) जात होते. रुपाभवानी चौकातील कचरा संकलन केंद्रासमोर आयशर टेम्पोने त्यांना जोरदार धडक दिली. यामध्ये तिघेही गंभीर जखमी झाले. जोडभावी पेठ पोलिस ठाण्याचे हवालदार आर. डी. दुधाळे यांनी तिघांना रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात दाखल केले; परंतु उपचारापूर्वी तिघेही मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

(पान 2 वर..)

# एकरूख योजनेतून उजनीचे पाणी कुरनूर धरणात सोडले

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट तालुक्यासाठी वरदायिनी असलेल्या कुरनूर धरणात सध्या उजनी धरणातून सोडण्यात आलेले पाणी मिसळत आहे. एकरूख योजनेच्या माध्यमातून येत असलेले हे पाणी सध्या हरणा नदीत खळखळते आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

उजनी धरणात अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यांतील काही भागांसाठी ३ टीएमसी पाणी आरक्षित आहे. वर्षातून दोन



टप्प्यांमध्ये हे पाणी सोडण्याची प्रक्रिया राबविण्यात येते.

दोन वर्षांपूर्वी एकरूख उपसा सिंचन योजनेची यशस्वी चाचणी घेण्यात आली होती. यानंतर सातत्याने हे पाणी कुरनूर धरणात सोडण्यात येत आहे.

वास्तविक यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे कुरनूर धरण जवळपास दोन महिने ओव्हरफ्लो झाले होते. यानंतरही धरणात ८२२ दशलक्ष घनफुट म्हणजेच १०० टक्के पाणीसाठा शिल्लक होता.

मात्र, सद्यःस्थितीत बाष्पीभवन, विविध पाणीपुरवठा योजनेतील पाणीउपसा व शेतीसाठी सुरू असलेल्या पाणी उपशामळे धरणात ९० टक्के म्हणजेच ७५०. ६४३ दशलक्ष घनफुट इतका पाणीसाठा शिल्लक आहे.

प्राप्त मुबलक पाणीसाठ्यामुळे यंदाच्या वर्षी दुष्काळी परिस्थिती उद्भवणार नसल्याचे चित्र आहे, पण तरीही पाणीवापर प्रक्रियेचा विचार करता उजनीचे येणारे पाणी हे अक्कलकोट तालुक्यासाठी लाखमोलाचे ठरणार आहे.

सोडलेल्या पाण्यामुळे कॅनॉल शेजारील हरभरा, गहू, ऊस, ज्वारी उत्पादक शेतकरी व स्थानिकांना आधार मिळत आहे.






# मोहोळमध्ये भाजी मंडई प्रश्न पेटला

## आमरण उपोषणाला सुरुवात

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती संभाजी महाराज चौक, मोहोळ येथील भाजी मंडईच्या समस्यांकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप करत मोहोळ तालुका महिला काँग्रेस कमिटी (आय)च्या अध्यक्षा अंजली अशोक वस्त्रे यांनी १६ फेब्रुवारीपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे. यासंदर्भात त्यांनी जिल्हाधिकारी, सोलापूर तसेच मुख्याधिकारी, मोहोळ नगरपरिषद यांना निवेदन सादर केले आहे.

दि. २७ जानेवारी, २९ जानेवारी आणि ५ फेब्रुवारी रोजीही संबंधित विषयावर निवेदने देण्यात आल्याचे वस्त्रे यांनी नमूद केले आहे. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने मंडई पूर्वीप्रमाणेच संभाजीनगर चौकात भरत असल्याचा आरोप त्यांनी केला.

### शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न

भाजी मंडईच्या ठिकाणी जिल्हा परिषद मराठी शाळा असल्यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून लहान विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. मुख्य चौक व मुख्य रस्त्यावर मंडई भरत असल्याने सतत ट्रॅफिक जाम होत असून अपघातांच्या घटना वाढत असल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### मूलभूत सुविधांचा अभाव

भाजी विक्रेत्यांना कायमस्वरूपी जागा उपलब्ध नसून पाणी, शौचालय, गटार, वीज



आदी मूलभूत सुविधांचा अभाव आहे. अतिक्रमण हटविण्याच्या नावाखाली अन्यायकारक कारवाई होत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे लहान भाजी विक्रेत्यांचा उदरनिर्वाह धोक्यात आल्याचे वस्त्रे यांनी स्पष्ट केले.

तसेच मंडई परिसरात भाजीपाल्यामुळे भटक्या जनावरांची वर्दळ वाढत असून त्यामुळे नागरिक व वाहनांना अडथळा निर्माण होत असल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

### मागण्या काय?

अंजली वस्त्रे यांनी भाजी विक्रेत्यांसाठी कायमस्वरूपी जागेचे नियोजन करावे. पाणी, शौचालय, वीज, गटार आदी मूलभूत सुविधा तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात. गरीब शेतकरी व लहान विक्रेत्यांच्या पुनर्वसनाची योग्य व्यवस्था करावी. अशा आशयाच्या मागण्या प्रशासनासमोर केल्या आहेत.

भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ (१)(अ) व १९ (१)(ब) नुसार अभिव्यक्ती स्वातंत्र्य व शांततामय आंदोलनाचा अधिकार असल्याचा उल्लेख करत तसेच स्ट्रीट व्हेंडर्स (Protection of Livelihood and Regulation of Street Vending) Act, 2014 अंतर्गत रस्त्यावर व्यवसाय करणाऱ्या विक्रेत्यांच्या संरक्षणाची तरतूद असल्याचे निदर्शनास आणून देत, मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून आमरण उपोषणाला सुरुवात केली आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याची जबाबदारी घेत आंदोलन शांततेत पार पडेल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, या निवेदनासोबत मंडईतील दुकानदार व व्यापाऱ्यांच्या सह्या, जिल्हा परिषद शाळेचा पूर्वीचा अर्ज तसेच नगरपरिषदेला दिलेल्या निवेदनांच्या प्रती जोडण्यात आल्याची माहिती आहे.

मोहोळमधील भाजी मंडईचा प्रश्न आता चिघळण्याची चिन्हे दिसत असून प्रशासन यावर काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.






# शासकीय दर्जा द्या, तोपर्यंत 30 हजार मानधन द्या

## अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अंगणवाडी सेविका व मदतनीसांना शासकीय कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा, तो निर्णय होईपर्यंत दरमहा किमान ३० हजार रुपये मानधन देण्यात यावे, अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर योजनाबाह्य कामांचा बोजा टाकू नये, एफआरएस प्रणालीअंतर्गत सुरू असलेले जाचक काम बंद करावे, तसेच केंद्र सरकारने लागू केलेल्या कामगारविरोधी नवीन चार श्रम संहिता रद्द करून जुने कामगार कायदे पुन्हा लागू करावेत, या प्रमुख मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचारी संघाच्या वतीने सोमवारी (दि. १६) सोलापूर येथे जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्यात आला.

चार हुतात्मा पुतळ्यापासून निघालेला हा मोर्चा जोरदार घोषणाबाजी करत जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचला. जिल्ह्यातील विविध भागांतून आलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस मोठ्या संख्येने या मोर्चात सहभागी झाल्या होत्या. 'एफआरएस बंद करा', 'योजनाबाह्य कामे नकोत', 'शासकीय दर्जा द्या' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

मोर्चानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्य कार्यकारी अधिकारी



यांना संघटनेच्या वतीने सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात केंद्र सरकारच्या नवीन चार श्रम संहितेमुळे कायमस्वरूपी रोजगार नष्ट होऊन निश्चित मुदतीच्या रोजगाराला प्राधान्य दिले जात असल्याने कामगारांचे शोषण वाढणार असल्याचा आरोप करण्यात आला आहे. सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण, कामगार हक्कांचे दुर्बलीकरण यासही संघटनेने तीव्र विरोध दर्शविला.

यावेळी संघटनेचे नेते सूर्यमणी गायकवाड यांनी मोर्चेकऱ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'अंगणवाडी कर्मचाऱ्यांकडून केवळ सेवाभावाच्या नावाखाली प्रचंड काम करून घेतले जात आहे. शासनाने त्यांना शासकीय कर्मचारी दर्जा द्यावा. तोपर्यंत किमान ३० हजार रुपये मानधन, ग्रॅच्युईटी व मासिक पेन्शन देणे गरजेचे आहे.'

निवेदनातील प्रमुख मागण्यांमध्ये अंगणवाडी कर्मचाऱ्यांना शासकीय दर्जा, कंत्राटी व तात्पुरत्या कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा कायदा, अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या मानधनात प्रोत्साहन भत्त्याचा समावेश, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ग्रॅच्युईटी, सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना पेन्शन, एफआरएस प्रणाली बंद करणे, निकृष्ट आहाराऐवजी उच्च प्रतीचा आहार देणे, स्मार्ट अंगणवाडी केंद्रांची उभारणी, ५जी मोबाईल व रिचार्ज भत्ता देणे आदी मागण्यांचा समावेश आहे.

सरकारने या मागण्यांकडे तातडीने दखल न घेतल्यास राज्यभर आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, तसेच अंगणवाडी कर्मचाऱ्यांवर योजनाबाह्य कामे लादू नयेत, असा ठाम इशाराही यावेळी संघटनेच्या वतीने देण्यात आला.




## संपादकीय

# कापूस-कोंडीची गोष्ट

व्यापार वाटाघाटी, करार यांबाबत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची शैली एव्हाना जगाला कळून चुकली आहे. सुरुवातीलाच आपल्याला अनुकूल अशा अटी, शर्ती आणि तरतुदी जाहीर करून मोकळे व्हायचे.

प्रतिक्रियांचा अंदाज घ्यायचा. त्या खूपच तीव्र असतील तर काही बाबतीत माघार घेतल्यासारखे करायचे. या शैलीनुसार अमेरिकी सरकारने भारताच्या बाबतीत आधी जारी केलेल्या निवेदनातील भाषा आता थोडीशी सौम्य केली असून, पुढच्या पाच वर्षांत पाचशे अब्ज डॉलरच्या वस्तू-सेवांची खरेदी अमेरिकेकडून करण्याचा 'मनोदय' (बांधिलकी नव्हे) भारताने व्यक्त केल्याचे अमेरिकेने सुधारित मसुद्यात नमूद केले आहे.

याशिवाय अमेरिकेतून येणाऱ्या डाळींवर आयातशुल्क सवलतीचा आग्रह डाळींच्या काही प्रकारांबाबत मागे घेऊन भारतातील डाळ उत्पादकांना दिलासा दिला आहे. लोकसभेत एकीकडे "मोदी सरकारने देश विकायला काढला आहे.", अशी घणाघाती टीका विरोधी पक्षनेते राहुल गांधी करीत असतानाच निवेदनाच्या मसुद्यातील बदल जाहीर झाले. परंतु एक-दोन बाबतीत बदल केले म्हणजे सगळे झाले असे नाही.काही गोष्टींत भारताबरोबरच्या वाटाघाटींत अमेरिकेने पाचर मारून ठेवली असून त्याबाबतीत भारताला आर्थिक व राजकीय दृष्टीनेही सजग राहावे लागेल. याचे सर्वांत ठळक उदाहरण म्हणजे वस्त्रोद्योगाबाबत अमेरिकेने भारत व बांगलादेशाशी केलेले करार. त्यांचा तपशील बारकाईने पाहिला तर भारतापुढील धोक्यांचा अंदाज येतो.

बांगलादेशात अमेरिकी कापूस किंवा कृत्रिम धाग्यांपासून बनवलेल्या तयार कपड्यांवर शून्य टक्के आयातशुल्क लावण्याच्या निर्णयामुळे बांगलादेशचे तयार कपडे हे १८ टक्के आयातशुल्क असलेल्या भारताच्या तुलनेत खूपच स्वस्त पडणार आहेत. अमेरिकेच्या निर्णयामुळे बांगलादेशाला कमी खर्च आणि निर्यात प्रोत्साहनाचा फायदा मिळत असतानाच भारतातून अमेरिकेला केल्या जाणाऱ्या तयार कपड्यांच्या ९० हजार कोटींच्या निर्यातीवर प्रतिकूल परिणाम होणार आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारताने अमेरिकेला सुमारे ११ अब्ज डॉलर (सुमारे ९० हजार कोटी रुपयांहून अधिक) किमतीचे कापड आणि तयार कपड्यांची निर्यात केली होती. भारताच्या एकूण कापड आणि तयार कपड्यांच्या निर्यातीमध्ये अमेरिकेचा वाटा जवळपास ३० टक्के असल्यामुळे भारतीय उत्पादकांसाठी अमेरिकेची बाजारपेठ अतिशय महत्त्वाची आहे. त्यामुळे भारतीय निर्यातीवर या निर्णयाचा नकारात्मक परिणाम होणार, हे उघडच आहे. हा नकारात्मक परिणाम केवळ भारतीय वस्त्रोद्योगाच्या उत्पादनापुरताच मर्यादित नसून त्याची झळ भारतातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांनाही बसणार आहे.

अमेरिकेने बांगलादेशाशी केलेला करार अमेरिकी कापूस वापरण्याशी जोडलेला आहे. त्यामुळे बांगलादेश अधिक प्रमाणात अमेरिकी कापूस खरेदी करू शकतो. बांगलादेशाने अमेरिकी कापूस जास्त प्रमाणात वापरल्यास भारतातून बांगलादेशात निर्यात केल्या जाणाऱ्या कापसाच्या मागणीमध्ये लक्षणीय घट होईल. भारतातून बांगलादेशात होणारी कापूसनिर्यात आधीच मंदावली आहे. बांगलादेश हा भारतीय कापूस आणि सूतखरेदी करणाऱ्या मोठ्या देशांपैकी एक आहे. जर मागणी कमी झाली तर विदर्भ व मराठवाड्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांसह भारतीय गिरण्या, निर्यातदारांवर परिणाम होऊन आधीच संकटात असलेले कापसाचे अर्थकारण आणखी बिघडू शकते. देशातील चौदा राज्यांमध्ये कापसाचे उत्पादन होते, महाराष्ट्रात हे प्रमाण सर्वाधिक आहे. आता येथील उत्पादकांच्या समस्या आणखी तीव्र होण्याचा धोका आहे. याला एक राजकीय अंगही आहे. भारताने बांगलादेशाच्या परांगदा माजी पंतप्रधान शेख हसीना यांना दिल्लीत आश्रय दिल्यापासून भारत-बांगलादेशादरम्यानच्या सौहार्दाच्या संबंधांमध्ये कमालीची कटुता निर्माण झाली आहे. त्यातच भारताने बांगलादेशी घुसखोरांविरुद्ध मोहीम सुरू केल्याच्या प्रतिक्रियेत बांगलादेशात हिंदू नागरिकांच्या हत्यांचे न थांबणारे सत्र सुरू झाले आहे. या कटुतेदरम्यानही भारत-बांगलादेशदरम्यानचे व्यापारसंबंध स्थिर होते.

पण आता अमेरिकी कापूस वापरून शून्य टक्के शुल्कावर तयार कपडे निर्यात करण्याची बांगलादेशाला अमेरिकेने मुभा दिली आहे. भारत-बांगलादेशादरम्यानच्या आधीच बिघडलेल्या संबंधात आगीत तेल ओतण्याचे हे काम आहे. बांगलादेशाची कापडउत्पादनाची क्षमता भारतापेक्षा कमी असली तरी त्याचा फायदा चीन व व्हिएतनामला मिळू शकतो. भारताची कापड आणि तयार कपड्यांची सुमारे ९० हजार ते एक लाख कोटींची निर्यात शाबूत राखण्यासाठी भारताने प्रयत्न करायला हवेत. उद्योग संघटनांनी ही मागणी केली आहेच. युरोपीय महासंघाबरोबर होत असलेल्या मुक्त व्यापार करारामुळे भारतीय कापड उद्योगाला नवीन बाजारपेठा मिळू शकतात आणि अमेरिकेतील तोटा काही प्रमाणात भरून निघू शकतो. पण त्यासाठी देशांतर्गत उत्पादनक्षमता, गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढवण्यावर भर द्यावा लागेल. थोडक्यात आर्थिक, राजनैतिक असे हे सर्वव्यापी आव्हान आहे. त्याला तोंड देण्यासाठी सज्ज राहावे लागेल आणि राष्ट्रीय हितसंबंधांना सर्वोच्च महत्त्व देत असताना कोणत्याही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपणाला बळी पडण्याची गरज नाही.

# भारताने अमेरिकेशी करार केलेत याचे स्वागत; परंतु भारतातील वाढती महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या व बेरोजगारीचे काय?

सध्याच्या परिस्थितीत सुपर पॉवर अमेरिका जगातील अनेक देशांशी आपली स्वार्थी चाल खेळुन दबावाखाली ठेवण्याचा प्रयत्न करीत आहे.अमेरिका जरी सुपर पॉवर असला तरी तो दगाबाज आणि धोकेबाज देश आहे ही बाब जगातील प्रत्येक देशाला चांगल्या प्रकारे ग्यात आहे. सर्वप्रथम भारता विरुद्ध टेरिफ वाढवुन भारताचा विश्वासघात केला. भारताने अमेरिकेची टेरिफ चाल पहाता आपण आपला मित्र देश रशिया जास्त जवळीक केली.त्याचबरोबर अमेरिकेला अलगथलग करण्यासाठी व त्याची अरेरावी कमी करण्यासाठी रशियाचा मित्र चीन आणि भारताचा कट्टर शत्रू यांची रशियाच्या सहाय्याने जवळीक वाढली आणि अमेरिकेला जशास तसे उत्तर देण्यासाठी म्हणून भारत, रशिया आणि चीन एकत्र येऊन याचा व्यापारीक करार मोठ्या प्रमाणात करण्यात आला.या तिन देशांच्या जवळीकला दोन ते तीन महिने होताच अमेरिकेने भारतावरील प्रेम वाढविले आणि टेरिफ कमी करण्याची घोषणा करत अनेक व्यापारीक करार झाले. परंतु हे संपूर्ण करार रशिया, चीन आणि भारत यांच्यात व्दीधा निर्माण करून अमेरिकेने भारताला पुन्हा जवळ केले यावरून भारताने अमेरिके पासून सावध रहाण्याची गरज आहे. अमेरिकेने अफगाणिस्तान, युक्रेन इत्यादी अनेक देशांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडून पसार झाला अशा प्रकारे जगातील अनेक देशांना आपल्या वर्चस्वासाठी आणि स्वाथार्साठी धोका दिला आहे.त्याच पध्दतीने अमेरिका भारतासोबत व्यापार व्यवहार करू शकतो याला नाकारता येत नाही. कारण अमेरिका कधीच कोणाचाच झाला नाही आणि होणार नाही.तो फक्त आपले व्यापारीक स्वार्थ शोधत असतो व त्याच्या सोबतच दोस्तीचा हात समोर करतो.परंतु त्या देशाला ब्लॅकमेल करून केव्हाही धोका सुद्धा देऊ शकतो.अमेरिकेने भारतासोबत व्यापार करार तर केलेत यातही त्याची अरेरावी दिसून येते.अमेरिका म्हणतो की, भारताने आमच्या कडून कापूस आयात केला तर टेक्सटाइलवर झिरो टेरिफ लागेल.परंतु भारताने जर अमेरिकेतून कापूस आयात केला तर भारतीय शेतकऱ्यांच्या कापसाला कवडीमोलाचे भाव येतील हेही तितकेच सत्य आहे. यावरून स्पष्ट होते की अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प भारतीय शेतकऱ्यांची कंबर तोडण्याच्या प्रयत्न करीत आहे. भारतात शेतकऱ्यांच्या अनेक समस्या आहेत.अजुनही भारतातील शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही. याकरीता अनेकदा आंदोलने होतांना आपण पहाले आणि आताही आंदोलने होत आहेत. परंतु कृषी प्रधान देशातील शेतकऱ्यांना अजुन पर्यंत योग्य न्याय मिळालेला नाही ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.विदेश निती टीकवुन ठेवण्यासाठी भारताचा अमेरिके सोबतचा करार योग्य आहे. परंतु भारताने हेही लक्षात ठेवले पाहिजे की पाकिस्तान,चीन पेक्षा जास्त दगाबाज अमेरिका सुद्धा आहे ही बाब संपूर्ण जग जाणतो. अमेरिकेच्या लक्षात आले की भारत,रशिया, चीन एकत्र आले तर आपली खैर नाही. त्यामुळेच अमेरिकेने टॅरिफ डाव खेळल्याचे स्पष्ट होते.भारत सरकारला हे लक्षात का येत नाही की, भारतात शेतकरी आत्महत्या का करतात.आजही भारतातील शेतकऱ्यांच्या समस्या व आत्महत्या थांबलेल्या नाहीत अशा परिस्थितीत अमेरिकेतील वस्तू जर भारतात कमी भावात मिळाली तर शेतकऱ्यांच्या मालाच्या भावाचे काय? असे अनेक प्रश्न आज शेतकऱ्यांपुढे उपस्थित होत आहे. भारताने अमेरिकेशी व्यापार करार करतांना हेही लक्षात ठेवले पाहिजे की, भारतातील महागाई, वाढत्या आधुनिकीकरणामुळे वाढती बेरोजगारी, ईपीएस - ९५ पेंशन धारकांचा प्रश्न, वाढते कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या ह्या संपूर्ण गंभीर समस्यांचे मुख्य कारण देशातील वाढती महागाई आहे.भारत सरकार देशातील महागाईकडे दुर्लक्ष करून अमेरिकेसोबत वाटेल ते करार करून देशात महागाईचा डोंगर उभा होत आहे यावर सुद्धा सरकारने लक्ष देण्याची गरज आहे.देशाचा विकास झपाट्याने होत आहे यात दुमत नाही.परंतु बेरोजगारीचा मोठा कळस उभा होत आहे या संपूर्ण गोष्टींकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.कारण देशाच्या विकासासोबत मुलभूत सुविधांकडे सुध्दा लक्ष देण्याची गरज आहे.याकडे दुर्लक्ष झाले तर गरीब व सर्वसामान्यांचे हाल बेहाल होतील. कारण देशात अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु एकाही सरकारने महागाईवर ठोस तोडगा काढलाच नाही. याचा परिणाम आजही देशातील ८० टक्के जनता महागाईच्या रूपात भोगत आहेत.देशातील महागाई कमी झाली तर सर्वच समस्या आपोआप कमी होईल.जय हिंद.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# एमआयटी विश्वप्रयागमध्ये राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण व मॉडेल मेकिंग स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठामध्ये स्कूल ऑफ फार्मसीतर्फे 'डिप्लोमा इन फार्मसी' (डी. फार्मसी) च्या विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय पोस्टर सादरीकरण व मॉडेल मेकिंग स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. औषधनिर्माण शास्त्रातील उदयोन्मुख विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, नाविन्यपूर्ण विचारसरणी आणि प्रभावी वैज्ञानिक संवादकौशल्य विकसित करण्याच्या उद्देशाने या स्पधेर्चे आयोजन करण्यात आले होते. स्पधेर्चे उद्घाटन मुंबईतील एआयओसीडी फार्मा लि. (AIOCD Pharma Ltd.) चे संचालक बसवराज मनुरे यांच्या हस्ते करण्यात आले.या स्पर्धेत एकूण ५२ पोस्टर्स आणि १९ मॉडेल्स सादर करण्यात आले, तर सुमारे १४० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. इतर संस्थांमधील प्राध्यापकांनीही यावेळी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना 'अशा स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, आत्मविश्वास आणि प्रभावी सादरीकरण कौशल्ये विकसित होतात. शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रातील आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेली संवादकौशल्ये आणि संशोधनाभिमुख दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होते.' असे प्रतिपादन प्रमुख पाहुणे बसवराज मनुरे यांनी केले.अशा उपक्रमांमुळे एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठातील अनुभवाधारित अध्यापन, नवोन्मेषी दृष्टीकोन आणि परिणामाभिमुख शिक्षणपद्धती अधोरेखित होते असे मत स्कूल ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता प्रा. अजीत कुलकर्णी यांनी व्यक्त केले. त्यांनी कार्यक्रमाचे संचालन केले तर समारोप आयक्यूएसी संचालक प्रा. रविराज कुलकर्णी यांनी केला.

# शिवजयंतीनिमित्त आयोजित पदयात्रा यशस्वी करण्यासाठी सर्व विभागानी जबाबदारीने काम करावे -अपर जिल्हाधिकारी निऱ्हाळी

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गुरुवार 19 फेब्रुवारी 2026 रोजी प्रशासनाच्या वतीने पदयात्रा आयोजित करण्यात आलेली आहे. ही पदयात्रा सकाळी 7.30 वाजता पार्क चौकातून सुरू होऊन छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत जाणार आहे. ही पदयात्रा यशस्वी पार पडण्यासाठी सर्व विभागांनी नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात, यासाठी क्रीडा विभागाने समन्वय ठेवावा, अशा सूचना प्र. जिल्हाधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिल्या.

शासन व विभागीय आयुक्त पुणे यांच्या सूचनेनुसार शिवजयंतीनिमित्त 19 फेब्रुवारी रोजी सोलापूर शहरात भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विभाग प्रमुखांची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी सदाशिव पडदुने, सहाय्यक आयुक्त मनपा मनीषा मगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक तुकाराम घाडगे, उपशिक्षणाधिकारी प्रकाश नांगरे, कौशल्य विकास विभागाच्या सहाय्यक आयुक्त संगीता खंदारे, तालुका क्रीडा अधिकारी राहुल गायकवाड, प्रशासनाधिकारी मल्हारी माने तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

सकाळी 7.30 वाजता पार्क चौक ते शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत आयोजित करण्यात आलेली पदयात्रा ही केवळ औपचारिक मिरवणूक न राहता ती तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारी, राष्ट्रप्रेम जागृत करणारी आणि स्वराज्याचा संदेश देणारी प्रेरणा ठरावी. तसेच पोलीस विभागाने वाहतूकीचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने करावे. क्रीडा विभाग व शिक्षण विभागाने या पदयात्रेत जास्तीत जास्त शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, खेळाडू उपस्थित राहतील यासाठी नियोजन करावे, अशा सूचना अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिल्या.

तसेच पदयात्रेदरम्यान महानगरपालिकेने विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, रुग्णवाहिका, डॉक्टर व ग्लुकोज पाकिटांची व्यवस्था करावी. शिक्षण विभागाने महाविद्यालय व शाळांतील विद्यार्थ्यांना पारंपरिक पोशाखात सहभागी होण्याबाबत सूचित करावे. त्याप्रमाणेच एनसीसी व एनएसएस विद्यार्थ्यांचाही सहभाग घ्यावा, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिल्या.

केंद्र शासनाच्या युवक कल्याण विभागामार्फत 'MyBharat' पोर्टलद्वारे सहभागी होण्याचे युवकांना आवाहन करण्यात आले आहे. सोलापूर शहरात पारंपारिक वेशभूषेत, ढोल-ताशा पथकांच्या गजरात आणि महाराजांच्या जयघोषात पदयात्रा काढण्यात येणार आहे.

# प्रभाग ४ मध्ये बंदपट्टेंची दमदार एंट्री; मतदारांचा विश्वास मिळवण्यासाठी सेवाभावाची सुरुवात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** सोलापूर महानगरपालिका निवडणूक २०२६ मध्ये प्रभाग क्रमांक ४ मधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या घड्याळ चिन्हावर प्रथमच निवडणूक लढवणारे सी.ए. सुशील बंदपट्टे यांनी सुमारे ४५०० मतदारांचा विश्वास संपादन करत स्थानिक राजकारणात लक्षवेधी एंट्री केली आहे. विजय-पराजयाच्या पलीकडे जाऊन 'ही हार-जीत नसून सेवेची सुरुवात आहे,' असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

ही त्यांची पहिली निवडणूक असली, तरी गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात सातत्याने काम केल्याचा उल्लेख त्यांनी केला. निवडणूक हा केवळ राजकीय टप्पा नसून लोकांशी नाते जोडण्याचा, त्यांच्या समस्या समजून घेण्याचा आणि विश्वास संपादन करण्याचा भावनिक प्रवास असल्याचे त्यांनी सांगितले.

'जवळपास ४५०० नागरिकांनी मतदान करून दाखवलेला विश्वास हा माझ्यासाठी केवळ आकडा नाही, तर मोठी जबाबदारी आहे,' असे ते म्हणाले. ज्यांनी साथ दिली त्यांचे आभार मानतानाच ज्यांचा विश्वास अजून मिळवायचा आहे, त्यांच्यापर्यंत कामाच्या माध्यमातून पोहोचण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.



**'राजकारण म्हणजे सातत्यपूर्ण जनसेवा'**

राजकारण हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नसून सातत्यपूर्ण जनसेवेचे माध्यम असावे, ही आपली भूमिका असल्याचे बंदपट्टे यांनी स्पष्ट केले. 'आपल्याला एखादी अडचण, प्रश्न किंवा अन्याय वाटत असेल तर सी.ए. सुशील बंदपट्टे म्हणून नव्हे, तर आपल्या हक्काचा माणूस म्हणून या,' असे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. त्यांनी आपला वैयक्तिक संपर्क क्रमांकही जाहीर केला.

चंद्रनील सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून विविध शासकीय योजना आणि सामाजिक उपक्रम राबवले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. फाउंडेशनचे कार्यालय बुधवार पेठ, महात्मा गांधी रोड, तरटी नाका पोलीस चौकीजवळ येथे असून नागरिकांसाठी कायम खुले असल्याचे त्यांनी सांगितले.

फाउंडेशनमार्फत मतदान नोंदणी व दुरुस्ती, सिव्हील हॉस्पिटल मदत कक्ष, बांधकाम कामगार कार्ड व संबंधित योजना, शालेय साहित्य वाटप, ई-श्रम कार्ड, महिला उद्योजक प्रोत्साहन कार्यक्रम, पॅन कार्ड सेवा, मोफत टॅली-एक्सेल संगणक प्रशिक्षण, शॉप ॲक्ट परवाना, महिलांसाठी मोफत कौशल्य प्रशिक्षण, प्रधानमंत्री मातृत्व वंदन योजना, लेक लाडकी व लाडकी बहीण योजना, आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरे, संजय गांधी निराधार व श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग पेन्शन योजना, महिला बचत गट संबंधित योजना, विविध महापालिका व राज्य शासनाच्या योजना, विकासासाठी एकत्र येण्याचे आवाहन या योजना व सेवा दिल्या जाणार असल्याची माहिती दिली.

'हे कार्यालय केवळ कार्यालय नाही, तर सामान्य माणसाच्या हक्कासाठी उभे राहणारे घर आहे,' असे सांगत त्यांनी नागरिकांना संवाद साधण्याचे आणि विकासासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन केले.

प्रभाग क्रमांक ४ मध्ये सामाजिक उपक्रमांमुळे ओळख निर्माण केलेल्या सुशील बंदपट्टे यांच्या पुढील वाटचालीकडे स्थानिक राजकीय वतुर्ळाचे लक्ष लागले आहे. निवडणुकीनंतरही सेवाभावाची भूमिका कायम ठेवण्याचा त्यांचा संकल्प आगामी काळात कितपत प्रत्यक्षात उतरतो, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# रांजणी-आलेगाव रस्ता सुरू करा अन्यथा 21 रोजी रस्ता रोको- संजय पाटील भिमानगरकर

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** रांझणी ते आलेगाव बु., रुई, आलेगाव खु., गार अकोले या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याचे अडीच वर्षांपासून रखडलेले मंजूर काम तातडीने आठ दिवसांत सुरू करावे, अन्यथा २१ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे-सोलापूर महामार्गावर बेमुदत रास्ता रोको आंदोलन छेडण्याचा इशारा जि.प.चे माजी कृषी व पशुसंवर्धन सभापती संजय पाटील-भिमानगरकर यांनी पत्रकार परिषदेत दिला.

पत्रकार परिषदेत बोलताना पाटील म्हणाले की, माढा तालुक्यातील रांझणी गणातील सात-आठ गावांसाठी तसेच भीमानदी पूल ते इंदापूर तालुक्यात व अकलूजकडे जोडणारा हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा असूनही अडीच वर्षांपासून रखडवण्यात आला आहे. या रस्त्यास प्रथम १७ कोटी आणि नंतर प्रजिमा नुसार १५ कोटी असा एकूण ३२ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. हा रस्ता सोलापूर-पुणे हायवेपासून आलेगावपर्यंत ७.५ मीटर रुंदीचा तर पुढे ३.७५ मीटर रुंदीचा प्रस्तावित असल्याचे त्यांनी सांगितले.



या रस्त्याचे काम देशमुख अँड देशमुख या कंपनीला मिळाले असून, हा रस्ता रांझणी, आलेगाव बु., रुई, आलेगाव खु., गार अकोले तसेच पुढे भीमा नदी पूल, टाकळी (टें) व कोंढार भागातील इतर गावांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे काम सुरू झाल्यानंतर नागरिकांनी रस्त्याच्या दर्जावर लक्ष ठेवावे, तसेच डीबीएम-डीबीसी कामाचा दर्जा तपासावा असे आवाहनही पाटील यांनी केले.

या कामाची मुदत २४ मार्च २०२५ रोजीच संपलेली असून, त्या मुदतीत रस्ता पूर्ण व्हायला हवा होता. संबंधित ठेकेदाराने काम न केल्यास शासनाने हे काम त्यांच्याकडून काढून घ्यावे व नवीन टेंडर काढावे अशी मागणी पाटील यांनी केली. तसेच ठेकेदारास ब्लॅकलिस्ट करून नियमाप्रमाणे दंडात्मक कारवाई करावी अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, या संदभार्तील निवेदन महाराष्ट्र शासन, पालकमंत्री व रस्ते विकासमंत्री यांना देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस नितीन मस्के, पांडुरंग माने, डॉ. विनोद चव्हाण, राहुल चौगुले व मल्हारी गवळी उपस्थित होते.

पान १ वरून

# टेम्पोच्या धडकेत दुचाकीवरील...

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. अपघातानंतर चालक टेम्पोसह पसार झाल्याने पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे तपास सुरू केला. दुपारी पोलिसांनी टेम्पोची माहिती मिळवली. निर्जन भागात टेम्पो सोडून चालक फरार झाला आहे. या गुन्ह्याचा तपास एपीआय विष्णू गायकवाड करीत आहेत.

**तरुण मुले गेल्याने आक्रोश**

घटनेची माहिती मिळताच नातेवाईक आणि मित्रांनी शासकीय रुग्णालयात मोठी गर्दी केली होती. घरातील कर्ती तरुण मुले गेल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. शासकीय रुग्णालयात कुटुंबीयांनी आक्रोश केला. तीनही तरुण वेगवेगळ्या क्षेत्रांत काम करत होते. नागेश गवंडी टोलनाक्यावर काम करीत होता. त्यांच्या पश्चात आई, बहीण आणि एक भाऊ आहेत. रोहन कोरे फायनान्स क्षेत्रात काम करत होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, भाऊ आणि एक विवाहित बहीण आहे, तर बसवराज चनशेट्टी पुण्यातील फायनान्स कंपनीत कार्यरत होता. त्यांच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ आहे.

# सोलापूर महानगरपालिकेत मातंग समाजाचा स्वीकृत नगरसेवक नियुक्त करावा- सुरेश पाटोळे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र राज्यातील महायुती सरकारने मागील पाच वर्षांमध्ये मातंग समाजाचे अनेक वषार्पासून प्रलंबित असणारे प्रश्न सोडवण्यासाठी सकारात्मक पावले उचलली आहेत. अनुसूचित जातीच्या आरक्षण वर्गीकरणासाठी निवृत्त न्यायमूर्ती मनोहर बदर यांच्या अध्यक्षतेखाली आयोग नेमला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (बार्टी) याच्या धर्तीवर अण्णाभाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था (आर्टी) ची स्थापना केली. या संस्थेमार्फत मातंग समाजातील तरुणांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम राबवले आहेत. साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे आणि आद्य क्रांतिगृह लहुजी वस्ताद साळवे यांच्या स्मारकासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळास निधीची उपलब्धता करून दिली आहे याचीच फलनिश्चिती म्हणून महाराष्ट्र राज्यातील मातंग समाज मोठ्या संख्येने भारतीय जनता पार्टीच्या मागे मागील विधानसभा निवडणुका पासून खंबीरपणे उभा राहिला आहे. नुकत्याच झालेल्या २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये देखील मातंग समाजाने भारतीय जनता पक्षाला भरघोस मतदान केले आहे.

सोलापूर महानगरपालिकेमध्ये देखील भारतीय जनता पक्षाचे ८७ नगरसेवक निवडून आणण्यासाठी मातंग समाजाने भरघोस असे मतदान केले आहे, भारतीय जनता पक्षाने सोलापूर महानगरपालिकेसाठी मातंग समाजातील अनेक इच्छुक उमेदवार पैकी फक्त एका उमेदवारालाच उमेदवारी दिली होती. जो बहुमताने निवडून आलेला आहे. सोलापूर शहरातील प्रत्येक प्रभागांमध्ये मातंग समाजाची १००० ते २००० पर्यंत निर्णायक लोकसंख्या आहे. आता सोलापूर महानगरपालिकेत मातंग समाजाचा एकच निर्वाचित नगरसेवक असल्यामुळे समाजाला पुरेसे प्रतिनिधित्व मिळालेले नाही. सोलापूर शहरात मातंग समाजाचे मोठ्या संख्येने डॉक्टर,इंजिनियर, वकील, शिक्षक, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते कार्यरत आहेत.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार आपण यापैकी किमान एका व्यक्तींला स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्त करावे अशी मागणी मातंग समाजाचे नेते तथा राज्य समन्वयक सकल मातंग समाज सुरेश पाटोळे यांनी राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे ईमेलद्वारे केली आहे.

## वात्रटिका

### कितीदा फोडणार टिव्ही

खेळ खेळून दाखवत आपला
संघ वाचवता आला पाहिजे...
आणि पराभव झालाच तर
तो देखील पचवता आला पाहिजे...
पचनी पडला नाही पराभव
म्हणून केक तोंडात कोंबला...
कुठे तर अजून कहरच झाला
पुन्हा हरवले म्हणून टिव्ही फोडला...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# सोलापूर महानगरपालिकेत शिवजयंती निमित्त भव्य रक्तदान शिबिर संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सवाचे औचित्य साधून, छत्रपती शिवाजी महाराज जयंती मंडळ (सोमपा) यांच्या वतीने आज दिनांक १६ फेब्रुवारी २०२६ रोजी सोलापूर महानगरपालिका परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते उत्साहात पार पडले.



**मान्यवरांची उपस्थिती**

रक्तदान शिबिराचे उद्घाटन माननीय उपमहापौर सौ. ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री. महेश देवकर, नगरसेवक श्री. विनोद भोसले आणि नगरसेवक श्री. सत्यजित वाघमोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सोलापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. सचिन ओम्बेसे आणि उपायुक्त आशिष लोकरे यांनी शिबिरास भेट देऊन रक्तदात्यांचा उत्साह वाढवला. महापालिकेच्या आवारात अशा सामाजिक उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल आयुक्तांनी मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे विशेष कौतुक केले. शिवजन्मोत्सव मंडळाचे अथक परिश्रम हे शिबिर यशस्वी करण्यासाठी शिवजन्मोत्सव मंडळाच्या खालील पदाधिकाऱ्यांनी आणि सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले: संस्थापकः माऊली पवार, अध्यक्षः प्रभुलिंग पुजारी, सल्लागारः प्रदीप जोशी, सदस्यः सोहन माने, मेघराज साळुंखे, सौरभ सांगवे, श्रीकांत घोलप, दत्ता गायकवाड, महादेव ढेकणे, श्रीकांत भडके, श्रीनिवास रामगल, गणेश डेंगळे, विक्रम पाटील, अमृत हावळे आणि सतीश कोळी आदी मान्यवर उपस्थिती होते. रक्तदान हेच सर्वश्रेष्ठ दान असल्याचे मानून, शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला सामाजिक बांधिलकी जपण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. महापालिकेतील कर्मचारी, अधिकारी आणि नागरिकांनी या शिबिरात उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

# आरटीई अंतर्गत १७ फेब्रुवारीपासून अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियमांतर्गत (आरटीई) दुर्बल आणि वंचित घटकातील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा, विना अनुदानित शाळांमध्ये २०२६-२७ या वर्षासाठी प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. बालकांच्या पालकांना यासाठी संबंधित अर्ज भरण्याची प्रक्रिया १७ फेब्रुवारी ते १० मार्च या कालावधीत https://student.maharashtra.gov.in/adm_portal या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. ही प्रक्रिया राबविण्याबाबत सुधारित सूचना निर्गमित करण्यात आल्या असल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक (प्राथमिक) शरद गोसावी यांनी दिली आहे.

**ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याबाबत मार्गदर्शक सूचना**

आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांना स्वयं अर्थसहाय्यित शाळा/ विनाअनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली किंवा पूर्व प्राथमिक वर्ग या स्तरावर २५ टक्के प्रवेश प्रक्रियेकरिता पालकांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. वंचित घटकांतील बालकांमध्ये अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), (क), (ड) इतर मागासवर्ग (ओबीसी), विशेष मागासवर्ग (एसबीसी), आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास घटक, एचआयव्ही बाधित किंवा प्रभावित बालक, अनाथ बालके, दिव्यांग बालके अथवा कोविड प्रभावित बालकांचा समावेश होतो. तर, आर्थिक वर्षामध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे अशा बालकांचा आर्थिक दुर्बल गटामध्ये समावेश होतो. बालकांच्या पालकांना त्यांच्या निवासस्थाच्या ठिकाणापासून एक किमी पेक्षा कमी अंतरावरील शाळा (हवाई अंतर) आरटीई पोर्टलवर दिसतील. या अनुषंगाने प्रक्रियेकरिता विचारपूर्वक १० शाळांची निवड करण्यात यावी आदी सूचना शिक्षण संचालनालयामार्फत देण्यात आल्या आहेत.

अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे जोडण्यात यावीत, अचूक माहिती भरण्यात यावी, तसेच विहित मुदतीमध्ये परिपूर्ण अर्ज भरला जाईल याची दक्षता घ्यावी. प्रवेश प्रक्रियेदरम्यान काही समस्या असल्यास आरटीई पोर्टलवर मदत केंद्रांची माहिती देण्यात आलेली आहे. त्यांच्याशी संपर्क करुन समस्येचे निराकरण करता येईल, असेही शिक्षण संचालनालयामार्फत कळविण्यात आले आहे.

**जाहिर पब्लिकेशन**

यो.अर्ज क्र:१६९/२०२६
कलम ५०अ (१)

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय सोलापूर विभाग सोलापूर**

**सोलापूर येथील मे.सहाय्यक धर्मादाय आयुक्त सोलापूर यांच्या न्यायालयात**

१)श्री विठ्ठल दिनकर पाटील
२)श्री बाळासाहेब सुखदेव भुसे } **अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही } **सामनेवाला**

सदरकामी अर्जदार यांनी श्री हनुमान देवस्थान ट्रस्ट गट क ३६१ मु घरनिकी पो मारापूर ता मंगळवेढा जि सोलापूर - नोंदणी क्रमांक ए-१५०८(सोलापूर) या न्यासाच्या संदर्भात मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ५०(अ)(१) अन्वये संस्थेच्या योजना अर्ज या कार्यालयात दाखल केलेले आहे. सबब नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, या न्यासाचे आपले काहीही संबंध असल्यास कोणतेही हरकत /तकार नोंद करावयाची असल्यास आपण स्वतः किंवा वकिलामार्फत ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३०दिवसाच्या आत आपली हरकत लेखी स्वरूपात दाखल करावी. ३० दिवसानंतर आपले कुठलेही प्रकारच्या हरकतीचा व कुठल्याही बाबींचा विचार केला जाणार नाही आणि एकतर्फा हुकम करून सदरचे प्रकरण निखाली काढण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त सोलापूर, यांच्या शिक्यानिशी आज दिनांक १७/०२/२०२६ रोजी दिली.

**लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**सार्वजनीक न्यास नोंदणी कार्यालय**
**सोलापूर विभाग सोलापूर**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**
**सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३**
**ई-निविदा सुचना क्रमांक ४३ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**
**"बी-१ निविदा"**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर- ४१३००३ निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत व सा.बां. विभागाकडून नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदार यांचेकडून खालीली कामा करिता "बी-१" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहोत. निविदा कागदोपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर. ४१३००३ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | निविदेचा प्रकार | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रु. | ठेकेदाराचा अधीकृत वर्ग |
|---|---|---|---|---|
| १ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत:मंद्रूप निंबर्गी भंडारकवठे रस्ता प्र.जि.मा.६ कि.मी. ०/०० ते ८/५५० मध्ये सुधारणा करणे.ता. दक्षिण सोलापूर. जि. सोलापूर | बी-१ निविदा | ७,७२,६७,३८८/- | सार्वजनिक बांधकाम विभागा कडील नोंदणी अनिवार्य नाही |
| २ | केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत:रा.मा.-५२ ते कुरघोट माळकवठे निंबर्गी विंचूर कुसूर रस्ता प्र.जि.मा.६१कि.मी.०/००ते०/७०० आणि कि.मी.४/००ते८/०० मध्ये सुधारणा करणे.ता.दक्षिण सोलापूर.जि. सोलापूर | बी-१ निविदा | ४,७५,०४,४८२/- | सार्वजनिक बांधकाम विभागा कडील नोंदणी अनिवार्य नाही |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | दि. १७/०२/२०२६ (वेळ सकाळी १०.०० वा. पासून) ते २४/०२/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| निविदा पूर्व बैठक | निविदा पूर्व बैठक २०/०२/२०२६ मा. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नविन मध्यवर्ती इमारत पुणे-१ यांचे कार्यालयात १२.३० वा. सदर निविदा पूर्व बैठक (online via link generated). व्दारे होणार आहे. |
| तांत्रिक व आर्थिक निविदा सादर करणेचा अखेरचा दिनांक. | दि. २४/०२/२०२६ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| मुळ दस्तऐवज सादर करण्याचा अंतिम दिनांक (निविदा :- शर्त ८.१) | ई-निविदा पोर्टलवर "बीड लॉक" झाल्यानंतर ७२ तासात "हार्ड कॉपी १ प्रतीत कंत्राटदारांनी खालील कार्यालयामध्ये सादर करणे अनिवार्य आहे. १. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर |
| निविदा उघडण्याचा कालावधी ठिकाण व वेळ. | दि.२५/०२/२०२६ मा. अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ, यांचे कार्यालयात सकाळी ११.०० वाजता. |

निविदा सुचनाबाबतची सविस्तर माहिती खालील संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
१) www.mahapwd.gov.in २) www.mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३)कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर ४१३००३ कार्यालयात सुचना फलक

**सही/- (मनोज रा. ठाकरे)**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर**

(डीजीआयपीआर-२०२५-२६/क्र-५/सी५९०३)

# महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट-2026' मध्ये महिला समृध्दीचा निर्धार

**नवी दिल्ली, (वृत्त सेवा):-** आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) हे केवळ एक तांत्रिक साधन नसून शिक्षण, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राचा केंद्रबिंदू ठरत आहे. आगामी काळात एआयमुळे रोजगाराच्या संधी आणि स्वरूप मोठ्या प्रमाणात बदलणार असून महिलांनी या तंत्राच्या केवळ 'वापरकर्त्या' म्हणून न राहता संशोधक आणि निमार्ते होऊन नव्या परिवर्तनाचे नेतृत्व करावे. महिलाच्या आर्थिक सक्षमीकरणाला एआयची जोड मिळाल्यास त्यांचा शाश्वत विकास होउ शकेल असा आशावाद राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी आज येथे व्यक्त केला.




दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट'मध्ये आज दुपारी राष्ट्रीय महिला आयोग , आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना आणि संयुक्त राष्ट्र प्रशिक्षण व संशोधन संस्था (युनिटार) या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने एआय आणि आर्थिक शक्ती - महिला नेतृत्वातील समृद्धीची रूपरेषा या विषयावर आयोजित विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी समारोपीय भाषणात त्या बोलत होत्या. मंचावर युनिटारच्या संचालिका (समृद्धी विभाग) मिहोको कुमामोटो, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाच्या (आयटीयू) प्रादेशिक संचालिका (आशिया-पॅसिफिक) अत्सुको ओकुदा, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आणि संगीतकार निमार्ता कार्तिक शाह उपस्थित होते.

या समिटमधील चर्चासत्र हा केवळ संवाद नसून ती एक चळवळ आहे. भारतीय महिलांनी नेहमीच परिवर्तनाचे नेतृत्व केले आहे, असा दाखला देऊन श्रीमती रहाटकर पुढे म्हणाल्या, एआय सारख्या नव्या तंत्रज्ञानातही महिला मागे राहणार नाहीत. त्यासाठी त्यांना अनुरुप प्रक्षिशण व योग्य अशी इको स्टिटीम दिली जाईल. महिलांची केवळ भागीदारी अपेक्षित नसून त्यांच्याकडे या तंत्राची मालकी आली पाहिजे. त्यासाठी महिलांना 'एआय साक्षरता' प्राप्त होणे अत्यावश्यक आहे. यामध्ये डेटा संरक्षण, डिजिटल नीतिमत्ता आणि सायबर सुरक्षेची सखोल समज आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. केवळ घोषणांऐवजी प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देत सूक्ष्म व लघुउद्योगांना जागतिक पुरवठा साखळीशी जोडण्याचे आवाहन करुन राष्ट्रीय महिला आयोग त्यासाठी कृतीशील प्रयत्न करेल, असा विश्वास त्यांनी दिला.

या सत्रात ब्रिजेश सिंह यांनी महिलांना भेडसावणाऱ्या डिजिटल धोक्यांवर प्रकाश टाकला. एआयची निर्मिती प्रामुख्याने पुरुषप्रधान मजकूर आणि डेटाच्या आधारे झाल्याने त्यामध्ये संवेदनशीलता, न्याय आणि समतेचा अभाव दिसून येतो. ही प्रणाली केवळ कार्यक्षमतेच्या 'हायपर-ऑप्टिमायझेशन'वर लक्ष केंद्रित करते, ज्याचा विपरित परिणाम महिलांच्या सुरक्षिततेवर होत आहे. आकडेवारीनुसार, 'डीपफेक' तंत्रज्ञानाच्या ९१ टक्के बळी महिलाच आहेत, जे अत्यंत धक्कादायक आहे. महिलांविरोधात होणारे अत्याचार, डीपफेकसारखे प्रकार यावर निश्चित आणि प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी आपण काही बाबी नक्की करु शकतो. सोशल मीडिया कंपन्यांनी 'सेफ हार्बर' नियमांचा आधार घेत जबाबदारी झटकू नये, असे सांगत त्यांनी 'प्लॅटफॉर्म जबाबदारी'वर भर दिला. मुळात हा विषय प्लॅटफॉर्मच्या जबाबदारीचा आहे. जिथे प्लॅटफॉर्म जबाबदारी स्वीकारत नाहीत, तिथे सरकारने हस्तक्षेप करणं आवश्यक आहे. भारतामध्ये २०२१ मधील नियमांनुसार पीडित व्यक्तींना नोडल अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याची सुविधा आहे आणि ठराविक कालावधीत आक्षेपार्ह सामग्री हटविणे कंपन्यांना बंधनकारक आहे. तसेच एआय-निर्मित प्रतिमांवर 'वॉटरमार्क' सक्तीचे करण्याची गरजही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

युनायटेड नेशन्स इन्स्टिट्यूट फॉर ट्रेनिंग अँड रिसर्चच्या मिहोको कुमामोटो यांनी आपले विचार मांडताना क्षमता बांधणी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्यावर भर दिला. यामुळे महिलांना एआय-आधारित जागतिक संधींचा लाभ घेता येईल. यामुळे महिलांचा सर्वांगीण विकास होईल असा विश्वास व्यक्त करुन त्या म्हणाल्या, युनीटारला भारत सरकार, राष्ट्रीय महिला आयोग, आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ, तसेच इतर संयुक्त राष्ट्र भागीदारांसोबत व्यावहारिक समृध्दीसाठी एआय हे उदिष्ट ठेऊन पुढील कार्यक्रम अंमलात आणण्याची इच्छा आहे. हे कार्यक्रम स्थानिक वास्तवावर आधारित असतील, महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला बळ देतील आणि इतर देशांना उपयोगी पडेल असे पुराव्यावर आधारित मॉडेल उभारतील. म्हणूनच, जेव्हा ग्लोबल साउथमधील कृत्रिम बुद्धिमत्तेची कथा लिहिली जाईल, तेव्हा महिलांचा उल्लेख तळटीपेत न राहता, सामायिक आणि सर्वसमावेशक समृद्धीच्या मुख्य अध्यायाच्या लेखिका म्हणून त्यांची नोंद होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

इंटरनॅशनल टेलिकम्युनिकेशन युनियनच्या अत्सुको ओकुडा यांनी द्वितीय आणि तृतीय शहरांमधील महिलांसाठी डिजिटल समावेशकता वाढवण्याची आणि डिजिटल दरी कमी करण्याची गरज अधोरेखित केली. एआय नवसंशोधनाचे रूपांतर महिलांच्या प्रत्यक्ष आर्थिक सक्षमीकरणात करण्यासाठी एक 'प्रॅक्टिकल रोडमॅप' तयार करण्याबाबत भारताने पुढाकार घ्यावा असेही सांगितले.

एआय संगीत निमार्ते कार्तिक शाह यांनी सर्जनशील आणि डिजिटल अर्थव्यवस्थेत महिलांसाठी असलेल्या वाढत्या संधींबाबत यावेळी माहिती दिली. एआय मुळे कला क्षेत्रात होऊ शकणा-या बदलामुळे त्यांनी महिलांना या तंत्रामुळे पाठबळ लाभणार असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीमती मिहोको कुमामोटो यांनी मॉडरेटर म्हणून सत्राची जबाबदारी साभाळली.

सत्राच्या प्रारंभी महिला सक्षमीकरणाचा संदर्भ असलेली एआय वर आधारित चित्रफित दाखविण्यात आली. या सत्राचे संचालन सलोनी लखिया यांनी केले. श्रीमती आकांक्षा यांनी सहभागी वक्तूयांचा परिचय करुन दिला.

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**बोअरवेल**
**सोलापूरात प्रथमच**
**मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क -
शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस
रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**
**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वर-वधू**



**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**
सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंद्र
**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779

**पाहिजेत**
चिंचोळी MIDC,
सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ -
11:30 ते 2 वा.


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहितीमधील मजकूर जाहिरतदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी प्रशालेत शिवमूर्ती प्रतिष्ठापना



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी प्रशाला येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवमूतीर्ची प्रतिष्ठापना सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या शिवमूतीर्ची प्रतिष्ठापना सोलापूर महानगरपालिकेचे महापौर श्री. विनायक कोंड्याल यांच्या शुभहस्ते करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रारंभी शिवमूतीर्चे पूजन व विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कायार्चा व आदर्शाचा गौरव करत त्यांच्या विचारांचे आजच्या पिढीने अनुकरण करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.त्यानंतर महापौर श्री. विनायक कोंड्याल यांच्या हस्ते भव्य शस्त्रास्त्र व पुरातन नाणी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनामध्ये ऐतिहासिक शस्त्रास्त्रांचा तसेच विविध कालखंडातील दुर्मिळ व मौल्यवान पुरातन नाण्यांचा समावेश करण्यात आला होता. इतिहासाची जपणूक व संवर्धन करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे महापौरांनी आपल्या मनोगतात नमूद केले.महापौर श्री. कोंड्याल यांनी आपल्या भाषणात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, दूरदृष्टी व राष्ट्रभक्ती ही प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे. विद्यार्थ्यांनी इतिहासातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.या कार्यक्रमासमनोहर सपाटे,ज्ञनेश्वर सपाटे, महेश माने, महादेव गवळी,राजेंद्र शिंदे,विनायक पाटील, प्रभाकर खंडाळकर मंडळाचे पदाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विविध मान्यवर उपस्थिती होते.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता -*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर-** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

## सुडोकु - 178

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 5 | | | | 4 | 3 |
| 4 | 7 | | 1 | | 2 | | 5 | |
| | | | | | | 2 | 9 | 1 |
| 9 | | 3 | 4 | | | 5 | 8 | 6 |
| 6 | | | | | 5 | | 2 | |
| | 5 | | | | | 1 | 7 | |
| 3 | | 5 | 8 | | | 9 | 6 | 2 |
| | 2 | 6 | 3 | | 9 | 8 | | 5 |
| 8 | | | | 5 | | | | |

# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सोलापूरात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा प्रशासन आणि सांस्कृतिक कार्य विभाग यांच्या वतीने सोलापूर शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांद्वारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अद्वितीय कार्याचा व जीवनमूल्यांचा प्रसार होणार असून नागरिकांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी केले आहे.



कार्यक्रमाचे तपशील पुढीलप्रमाणे, मंगळवार दि. 17 फेब्रुवारी 2026 रोजी हुतात्मा स्मृती मंदिर येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रयोग तर बुधवार दि. 18 फेब्रुवारी 2026 रोजी श्री शिवछत्रपती रंगभवन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम संध्याकाळी 6.00 ते 9.00 या वेळेत होणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी या कार्यक्रमात उपस्थित राहावे असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात येत आहे.

# लायन्स शिशु विकास मंदिर व लायन्स प्राथमिक शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन संपन्न



या वार्षिक स्नेहसंमेलनमध्ये शाळेतील अनेक गरीब विद्यार्थ्यांना आर्थिक परिस्थितीमुळे सहभाग घेता येत नव्हता. अशा गरीब गरजू व स्नेहसंमेलनाच्या आनंदापासून वंचित असलेल्या मुलांची दखल लायन्स क्लबचे अध्यक्ष अभय खोबरे यांनी घेतली. त्यांनी अशा गरीब विद्यार्थ्यांना एकत्र करून त्यांच्या दोन कार्यक्रमाचा खर्च स्वतः उचलला. त्या विद्यार्थ्यांना सोलापूर येथील अनिल राठोड यांनी प्रशिक्षण दिले. छावा व रामायण हे दोन कार्यक्रम स्नेहसंमेलनात सादर करण्यात आले व त्यांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली.

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** तालुक्यात शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेल्या लायन्स क्लब ऑफ अक्कलकोट ट्रस्ट संचलित लायन्स शिशु विकास मंदिर व लायन्स प्राथमिक शाळा अक्कलकोटचा वार्षिक स्नेह संमेलन व पारितोषक वितरण समारंभ सोहळा मोठ्या थाटामाटात उत्साहात श्री कमलाराजे चौकातील नगरपरिषदेचे प्रियदर्शनी मंगल कार्यालय येथे संपन्न झाला.

दरम्यान सोहळ्याचे दीपप्रज्वलन श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त व अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा- अलकाताई जनमेजयराजे भोसले यांच्या व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध कला सादर केल्या. यामध्ये सोलापूर येथील अनिल राठोड यांनी प्रशिक्षण दिलेल्या छावा व रामायण या पात्रांना उपस्थितांनी भरभरून दाद दिली. या सह मेरे देश की धरती..... !, मुकुंदा, मुकुंदा.... !, लाडाची गं..... !, यल्लमा, यल्लमा..... !, ढिपांग..... !, वाऱ्यावरती..... ! या विविध गाण्याच्या नृत्याने श्रोत्यांची मने जिंकली. विविध क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना या प्रसंगी श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे विश्वस्त व अन्नछत्र मंडळाची सहयोगी संस्था असलेल्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा- अलकाताई जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते पारितोषक वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमास लायन्स क्लब अक्कलकोट ट्रस्ट चे अध्यक्ष व शाळा व्यवस्थापन समितीचे चेअरमन राजेंद्र हत्ते, लायन्स क्लब अक्कलकोट अध्यक्ष अभय खोबरे, माजी प्रांतपाल राजशेखर कापसे, चार्टर मेंबर संस्थापक डॉ. अरुण परिचारक, झोन चेअर पर्सन मल्लिकार्जुन मसुती हे प्रमुख उपस्थित होते.

या प्रसंगी क्लब चे उपाध्यक्ष सुभाष गडसिंग, सचिव शिरीष पंडित, शिवशरण खुबा, खजिनदार विठ्ठलराव तेली, प्रभाकर मजगे, मल्लिनाथ साखरे, सहीद वळसंगकर, प्रकाश उण्णद, सुभाष खमितकर, महिबूब सलगरकर, सिद्धय्या मठ, शिवपुत्र हळगोदे, प्राथमिक शाळा मुख्याध्यापिका- श्रीदेवी खुने, शिशु विकास मंदिरचे मुख्याध्यापिका- महानंदा निलगार, सांस्कृतिक विभाग प्रमुख गौरीशंकर चनशेट्टी, कार्याध्यक्षा स्नेह संमेलन श्रद्धा बागुल, विध्यार्थी प्रतिनिधी चि. समर्थ चितली, कु. जान्हवी गव्हाणे, शिक्षकेतर कर्मचारी रमेश शिंदे (माकणे) यांच्या सह सर्व संचालक मंडळ व सदस्य, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आदिजन बहुसंख्येने उपस्थित होते.

# एन बी नवले सिंहगडमध्ये 'लाईफ इज ऑल पॉझिटिव्ह' मार्गदर्शन सत्र उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केगाव येथील एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय एक दिवसीय 'लाईफ इज ऑल पॉझिटिव्ह' या विषयावर प्रेरणादायी मार्गदर्शन सत्र उत्साहात पार पडले. प्रमुख वक्ते म्हणून डीक परास्सिनी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



मुक्त प्रश्नोत्तर पद्धतीने झालेल्या या सत्रांत शिक्षण, करिअर, आत्मविश्वास, ताणतणाव, नातेसंबंध आदी विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रश्न उपस्थित केले. त्यावर डीक परास्सिनी यांनी सोप्या शब्दांत सकारात्मक दृष्टीकोनातून मार्गदर्शन करत जीवनात नकारात्मकतेला स्थान न देण्याचा संदेश दिला. देशातील विविध नामांकित शैक्षणिक संस्था व शासकीय यंत्रणांमध्ये मार्गदर्शन केलेल्या परास्सिनी यांनी 'लाईफ इज ऑल पॉझिटिव्ह' या सामाजिक उपक्रमातून आजवर हजारो लोकांपर्यंत सकारात्मक विचार पोहोचवला आहे. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून सत्रामुळे विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा व प्रेरणा मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. वक्त्यांनी समर्पक उत्तरे देत विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना नवी ऊर्जा आणि प्रेरणा मिळाली.

डीक परास्सिनी यांनी यापूर्वी देशातील नामांकित अभियांत्रिकी संस्था, वैद्यकीय विद्यापीठे तसेच राष्ट्रीय स्तरावरील शासकीय यंत्रणांमध्ये मार्गदर्शन केले आहे. 'लाइफ इज ऑल पॉझिटिव्ह' या सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून त्यांनी आजवर ६३ हजारांहून अधिक लोकांवर सकारात्मक प्रभाव टाकला असून १५ हजारांहून अधिक अन्नसेवा आणि १२ हजारांहून अधिक वृक्षारोपण उपक्रम राबवले आहेत.

या सत्रात त्यांनी विद्यार्थ्यांना करिअरवर लक्ष केंद्रित करणे, पालकांचा सन्मान राखणे, समाजासाठी काहीतरी परत देणे आणि स्वतःला सतत प्रेरित ठेवणे याबाबत मोलाचा संदेश दिला. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम. के. जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. एस. डी. नवले यांनी केले.

# पंढरपुरातील यमाई तलावाचे लोकनेते अजितदादा पवार स्मृती तलाव असे नामकरण करण्याची मागणी

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नुकतेच विमान अपघातात दुःखद निधन झाले असून यामुळे खऱ्या अर्थाने पश्चिम महाराष्ट्राचे खूप मोठे नुकसान झाले असून कधी ही न भरून येणारी पोकळी निर्माण झाली असून अजितदादांनी आपल्या उपमुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळात तीर्थक्षेत्र पंढरपूरसाठी भरभरून निधी दिला आहे. त्यातील एक महत्वाची आठवण म्हणजे आपल्या पंढरपूर शहरातील यमाई तलाव सुशोभीकरण करण्याचा निर्णय माजी आमदार प्रशांत परिचारक व नगरसेवक यांनी यमाई तलावामधील गाळ काढून हा तलाव एक पर्यटनस्थळ व्हावे म्हणून आग्रही भूमिका घेतली आणि यातील गाळ काढण्यासाठी लोक वर्गणी गोळा करून हा गाळ काढण्याचे ठरवले आणि हे करत असताना सर्व नगरसेवक व पदाधिकारी सर्व भागातून मांगो उशिसे जो देगा खुशिसे. ही घोषणा देत लोकवर्गणी गोळा करत असतानाच उपमुख्यमंत्री अजितदादा पवार पंढरपूर दौऱ्यावर आल्यानंतर ही वस्तुस्थिती समोर पाहून दादांनी तात्काळ बारामती येथील संबंधित अधिकारी यांना सूचना देऊन गाळ काढण्यासाठी लागणारी सर्व मशिनिरी पाठवून द्या आणि प्रशांत परिचारक यांना सुचना केली कि तुम्ही नगरपालिकेचे वतीने फक्त डिझेल द्या बाकी मैं हू ना या शब्दात दादांनी सर्व यंत्रणा दिली आणि तो गाळ काढण्याबा विषय मार्गी लागला.



भव्यदिव्य असा यमाई तलाव हा आज पंढरपुरात येणारे वारकरी, पर्यटक यांचेसाठी पर्यटन व आपल्या पंढरपूर शहरातील नागरिकांसाठी ट्रॅक उपलब्ध झाला ही खूप मोठी आठवण अजितदादांची पंढरपूरकरवासियांसाठी असून दादांचे नातं हे कायम जोडलेले राहावे म्हणून पंढरपूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी युवक काँग्रेस, राष्ट्रवादी महिला काँग्रेस यांच्या वतीने आम्ही विनम्रपूर्वक मागणी करतो कि, यमाई तलाव याला लोकनेते अजितदादा पवार स्मृती तलाव असे नामकरण करण्यात यावे असा ठराव पंढरपूर नगरपरिषदेने पास करून दादांच्या स्मृतीस आदरांजली ठरावी असे नामकरण करावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून राष्ट्रवादी युवकचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे यांनी निवेदनाद्वारे पंढरपूर नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांना केलेली आहे.

या निवेदनाची प्रत नगराध्यक्षा, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर च गटनेते, पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर यांना देण्यात आली आहे.

यावेळी राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्रीकांत शिंदे, शहराध्यक्ष मुहम्मद उस्ताद, महिला जिल्हाध्यक्ष वषार्ताई शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष दिगंबर सूडके, युवक शहराध्यक्ष अमोल परबतराव, माजी शहराधक्ष सुधीर आबा भोसले,जिल्हा सरचिटणीस सारंग महामुनी, सूरज पेंडाल जिल्हा युवक उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, शहर कार्याध्यक्ष प्रदीप निर्मळ, शहर उपाध्यक्ष संजय म्हणाने, धीरज टिकोरे शिवसेनेचे साईनाथ बडवे आदि उपस्थित होते.

# टेंभुर्णीत 'एफस्टीन फाईल्स' विरोधात वडार समाज संघटनेचे निषेध आंदोलन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** जगात खळबळ माजवणाऱ्या 'एफस्टीन फाईल्स' प्रकरणाच्या निषेधार्थ अखिल महाराष्ट्र वडार समाज संघटना यांच्या वतीने सोमवारी (दि. १६) सकाळी ११ वाजता टेंभुर्णी- कुडूर्वाडी रस्त्यावरील कुडूर्वाडी चौकात निषेध आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन राजकुमार बाबा धोत्रे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.



यावेळी उपस्थितांना संबोधित करताना राजकुमार बाबा धोत्रे म्हणाले की, जेफ्री एफस्टीन प्रकरणातील न्यायालयीन कागदपत्रांमध्ये (एफस्टीन फाईल्स) काही भारतीय व्यक्तींची नावे आल्याची चर्चा विविध माध्यमांतून होत आहे. त्यामुळे संबंधित नावांची सखोल चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा सोलापूर जिल्ह्यात व्यापक आंदोलन छेडले जाईल, असा इशारा त्यांनी सरकारला दिला.

दरम्यान, सामाजिक कार्यकर्ते महावीर वजाळे यांनी सांगितले की, अमेरिकेतील महिला पत्रकार ज्युली ब्राउन यांनी २०१८ साली या प्रकरणाला नव्याने प्रकाशझोतात आणले. त्यानंतर जेफ्री एफस्टीन याला अटक करण्यात आली आणि हे प्रकरण संपूर्ण जगापुढे उघडे झाले. 'एफस्टीन फाईल्स'मध्ये जगातील नामवंत राजकीय नेते व उद्योगपतींची नावे असल्याची चर्चा आहे. तसेच भारतातील राजकीय व उद्योजक क्षेत्रातील काही लोकांची नावे देखील चर्चेत असल्याचे सांगण्यात आले. यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, उद्योगपती अनिल अंबानी, केंद्रीय मंत्री हरदीप सिंग पुरी यांची नावे चर्चेत असल्याचा उल्लेख करून सरकारने याबाबत अधिकृत भूमिका स्पष्ट करावी व दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

बीएमपी अध्यक्ष प्रशांत गायकवाड यांनीही 'एफस्टीन फाईल्स'मधील सर्व नावांची निष्पक्ष चौकशी व्हावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दिला.

या आंदोलनात समाधान धोत्रे, तानाजी धोत्रे, रानबा मासुळे, सचिन सीना ननवरे, शंभू पवार, रोहित धोत्रे, विकास बंदपट्टे, सुनील पवार, विलाज जगताप, राहुल धोत्रे, सुरज धोत्रे, अक्षय जगताप, सचिन तांदळे, अक्षय काळे, रोहिदास पवार, नितीन धोत्रे, बालाजी मोहिते, अभिषेक धोत्रे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, 'एफस्टीन फाईल्स'प्रकरणाबाबत विविध देशांमध्ये न्यायालयीन प्रक्रिया सुरू असून, संपूर्ण जगात खळबळ उडाली आहे.

जगभरातील अनेक देशांमध्ये या प्रकरणावरून राजकीय वातावरण तापले असून, भारतात या प्रकरणाबाबत नेमकी भूमिका काय राहणार, याकडेही सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शिवजयंती दिनी 'मेरा युवा भारत' मेगा पदयात्रेचे आयोजन

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त १९ फेब्रुवारी रोजी संपूर्ण राज्यभरात 'माय भारत' (मेरा युवा भारत) मेगा पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून पुणे विभागातील सर्व जिल्ह्यांनी त्याबाबत काटेकोर नियोजन करून उपक्रम यशस्वी करावा, असे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीस जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्यासह दूरदृश्य प्रणालीद्वारे कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी तसेच विभागातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. पुलकुंडवार यांनी सांगितले की, भारत सरकारचे युवक व क्रीडा मंत्रालय आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शिवजयंतीनिमित्त या पदयात्रा आयोजित करण्यात येणार आहेत. त्यासाठी जिल्हा प्रशासन, पोलीस, शिक्षण विभाग तसेच आरोग्य विभागासह अन्य सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने तयारी करून हा उपक्रम यशस्वी करावा. विभागात सर्व जिल्ह्यात पदयात्रा आयोजित करण्यात येणार असून मुख्य कार्यक्रम सातारा येथे आयोजित करण्यात येणार आहे.

ते पुढे म्हणाले, या पदयात्रेमध्ये अधिकाधिक विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागी व्हावेत यासाठी शिक्षण विभागाने शैक्षणिक संस्थांशी तात्काळ समन्वय साधून नियोजन करावे. पदयात्रेत अधिकाधिक लोकप्रतिनिधी, विविध शासकीय अधिकारी, महिला, युवक आदी सहभागी व्हावेत यासाठी प्रयत्न करावेत. राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, भारत स्काऊट आणि गाईड आदीमधील विद्यार्थ्यांना सहभागी करून घ्यावे. उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून सकाळी लवकर पदयात्रा आयोजित करावी. मार्गावर आवश्यक तेथे पाण्याची, आरोग्य तपासणी, उपचारासाठी वैद्यकीय पथके, पुरेशा रुग्णवाहिका आदींची व्यवस्था करावी. लहान मुले येणार असतील तर त्यांची विशेष काळजी घ्यावी. आजारी मुले सहभागी होणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

आयोजित पदयात्रा ही केवळ औपचारिक मिरवणूक न राहता ती तरुण पिढीला महाराजांच्या विचारांशी जोडणारी, राष्ट्रप्रेम जागृत करणारी आणि स्वराज्याचा संदेश देणारी प्रेरणादायी चळवळ ठरावी, असेही डॉ. फुलकुंडवार यांनी सांगितले.

पोलीस विभागाने वाहतूक व्यवस्थापनाचा आराखडा करून योग्य ती अंमलबजावणी करावी अशा सूचना विशेष पोलीस महानिरीक्षक फुलारी यांनी पोलीस दलाला दिल्या.

केंद्र शासनाच्या युवक कल्याण विभागामार्फत 'MyBharat' पोर्टलद्वारे सहभागी होण्याचे युवकांना आवाहन करण्यात आले आहे. पुणे विभागात पारंपारिक वेशभूषेत, ढोल-ताशा पथकांच्या गजरात आणि महाराजांच्या जयघोषात पदयात्रा काढण्यात येणार आहेत.

# केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळ परिसरात 163 अन्वये कलम लागू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळ, नवी दिल्ली यांच्यामार्फत इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीच्या परीक्षा दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ ते २७ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. सदर परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्र परिसरात गैरप्रकार, दळणवळण साधनांचा गैरवापर तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये व परीक्षार्थींना कोणताही अडथळा होऊ नये तसेच परीक्षा प्रक्रियेशी संबंधित अधिकारी व कर्मचारी यांना आपली कर्तव्ये निर्विघ्नपणे पार पाडता यावीत, यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये आदेश लागू करण्यात आला आहे.

डॉ. अश्विनी पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा), सोलापूर शहर, मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आदेश देते की, दिनांक १७ फेब्रुवारी २०२६ ते २७ मार्च २०२६ (सुट्टीचे दिवस वगळून) दरम्यान सकाळी ०९.०० वाजलेपासून ते दुपारी ०२.०० वाजेपर्यंत खालील परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू राहतील —

केंद्रीय विद्यालय, मोदी रेल्वे पुलाजवळ, जांबवीर चौक, केएलई इंग्लिश मिडीयम प्रशाला, नरसिंह नगर, डी-मार्टजवळ, जुळे सोलापूर, इंडियन मॉडेल स्कूल, सिंहगड पब्लिक स्कूल, केगांव या सर्व परीक्षाकेंद्रावरील केंद्रीय माध्यमिक परीक्षा मंडळाचे इयत्ता 12 वी व 10 वी च्या परीक्षा संपेपर्यंत परीक्षा केंद्रापासून 100 मीटर परिसरात पुढील कृती करण्यास बंदी घालण्यात आली आहे.

- परीक्षा केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे.
- सार्वजनिक शांततेस बाधा निर्माण करणारे कृत्य करणे.
- परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरातील झेरॉक्स, फॅक्स, टायपिंग सेंटर, एसटीडी बूथ, ध्वनीक्षेपक, संगणक केंद्र, इंटरनेट कॅफे तसेच पानपट्टी आदी दळणवळण सुविधा कार्यरत ठेवणे.
- मोबाईल फोन, टॅबलेट, स्मार्ट वॉच, सेल्युलर फोन, वायरलेस सेट, कॅल्क्युलेटर, ट्रान्झिस्टर किंवा इतर इलेक्ट्रॉनिक साधनांसह परीक्षा केंद्र परिसरात प्रवेश करणे.
- परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात कोणत्याही वाहनास प्रवेश करणे.
- परीक्षा प्रक्रियेशी संबंधित नसलेली व्यक्ती उमेदवाराचे नातेवाईकासह परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात प्रवेश करणे.
- परीक्षा केंद्राचे 100 मीटर परिसरात पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येणे.

सदरचा आदेश परीक्षा प्रक्रियेशी संबंधीत सर्व शासकीय अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारीवृंद, परीक्षार्थी पोलीस अधिकारी, पोलीस अंमलदार, होमगार्ड यांना त्यांचे परीक्षेसबंधी कर्तव्य पार पाडण्याचे अनुषंगाने लागू राहणार नाही. या आदेशाचा कोणी कोणत्याही प्रकारे भंग केल्यास ती व्यक्ती भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 233 प्रमाणे शिक्षेस पात्र राहील असे पोलीस उप आयुक्त (गुन्हे/विशा) सोलापूर शहर डॉ. अश्विनी पाटील यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अन्न व औषध प्रशासन विभागातील लाच प्रकरणाची गंभीर दखल

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** अन्न व औषध प्रशासन विभागामधील लाच प्रकरणाची गंभीर दखल घेत अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी लाच घेताना पकडलेल्या लिपिकाविरोधात कठोर कारवाईचे आदेश दिले आहेत. संबंधित लिपिकाची केवळ चौकशीच नव्हे, तर त्यांची प्रतिनियुक्ती रद्द करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

विभागातील दक्षता पथकाला या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. लिपिक राजू ढेरिंगे याच्याविरुद्ध वस्तुनिष्ठ आणि सर्वकष अहवाल तातडीने सादर करण्यास सांगण्यात आले आहे.

राजू ढेरिंगे हे मूळ अन्न व नागरी पुरवठा विभाग येथील कर्मचारी असून सध्या अन्न व औषध प्रशासन विभागात प्रतिनियुक्तीवर कार्यरत होते.


## डी. के. पोद्दार

**अधिवक्ता व सल्लागार, नोंदणी क्रमांक. डी/३०२५-ए/१९९९**

**कार्यालय : बी- ००१, जीएफ, प्रॉस्पेरिटी टॉवर, सिक्का कार्मिक ग्रीन, सेक्टर - ७८, नोएडा, यूपी**

**ई मेल:-** dk.poddar1970@gmail.com **मो. नंबर ९९५८००६९१२**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते कि, या खाली नमूद केलेल्या शेत जमीन मिळकती (यापुढे सदर मिळकतींचा एकत्रित उल्लेख ''सदर मिळकत'' असा करण्यात आला आहे) आमचे अशील कायम खुशखरेदी / भाडेतत्वावर घेणार असून सदर मिळकतींच्या मालकांबरोबर त्याबाबत बोलणी चालू आहे. सदर जमीन मिळकतीच्या मालकांनी आमच्या अशिलांना सदर मिळकती जमीन मालकाच्या प्रत्यक्ष कब्जे वहिवाटीस असून त्यांनी त्या मालकीहक्क ताबे वहिवाटीने धारण केलेल्या असून त्या निर्वेध, निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा दिलेला आहे, तरी सदर शेतजमीन मिळकतीवर कोणाचेही कसल्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध, अधिकार, सदर जमीन मिळकतीचा एफ.एस.आय./टी.डी.आर. हक्क, गहान, दान, करार, भाडेपट्टा, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, साठेखत, खरेदीखत, असाइनमेंट, अलॉटमेंट, आदलबदल, शेती वापर परवाना, प्रोबेट, उत्तराधिकार प्रमाणपत्र, वारस प्रमाणपत्र, कौटुंबिक व्यवस्था / समझोता, इझमेंट, पोटगी, हुकूमनामा, न्यायालयाचा आदेश / निर्णय, विकसनाचा हक्क, संयुक्त प्रकल्प, इत्यादि हक्क वगैरे असल्यास त्यांनी ते सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पुढील ७ दिवसात खाली सही करणार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन अथवा वर नमूद इमेल ॲड्रेस वर मेल पाठवून सर्व मूळ कागदपत्रे दाखवून समक्ष खात्री करून द्यावी व तशी लेखी पोच घ्यावी, अन्यथा सदर शेत जमीन मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो स्वेच्छेने, हेतुपुरस्सर आणि जाणीवपूर्वक कायम स्वरूपी सोडून दिलेला आहे, असे समजून आमचे अशील पूढील व्यवहार पूर्ण करतील. तद्नंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही, कृपया याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी. सदर मिळकत चे गट नंबर व हस्तांतरित करण्यात येणारे क्षेत्र या खालील परिशिष्टात दिलेले आहे.

### परिशिष्ट

तुकडी किणी, पोट तुकडी तालुका अक्कलकोट, दुय्यम निबंधक अक्कलकोट यांचे हद्दीतील, जिल्हा परिषद सोलापूर, पंचायत समिती अक्कलकोट व ग्राम पंचायत किणी, गांव मौजे किणी, तालुका अक्कलकोट, जिल्हा सोलापूर या गावातील शेतजमीन मिळकती खालील प्रमाणे;

गट क्र. १०३ यांचे एकूण क्षेत्र - ४ हे ४५ आर

येणेप्रमाणे शेतजमीन मिळकती, त्यातील सर्व हक्क, हितसंबध, जाणे-येणेचे रस्त्याचे, वहीवाटीचे, हवा- पाण्याचे सर्व हक्क, अधिकार, हितसंबंधासह काही एक राखून न ठेवता अशी दरोबस्त मिळकत. दि. १६/०२/२०२६

**सही/-**
**ॲड. डी. के. पोद्दार**
**कार्यालय:-**
**बी - ००१, जीएफ, प्रॉस्पेरिटी टॉवर,**
**सिक्का कार्मिक ग्रीन, सेक्टर - ७८, नोएडा,**
**राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली, पिन:- २०१३०७**
**ईमेल:** dk.poddar1970@gmail.com
**मो. नंबर ९९५८००६९१२**